# आधुनिक व्हर्च्युअल कोर्ससाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीसोबत पढेगा भारत चा करार




कोरोनाच्या महासंकट काळात व्हर्च्युअल ऑनलाईन शिक्षण पध्दतीने आधुनिक कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वायत्त दर्जा प्राप्त अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने पढेगा भारतशी नुकताच करार केला आहे.

हेल्दीग्लोब स्मार्ट व्हर्च्युअल क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान संगत विविध कोर्सेस तसेच कौशल्य विकासाचे अनेक कोर्सेस व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाईन उपलब्ध केले आहेत. सदर ऑनलाईन प्लॅटफॉर्मची सुविधा टी.सी.कॉलेज तसेच परिसरातील अन्य हायस्कुल व महाविद्यालयांना उपलब्ध व्हावी यासाठी हा करार करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी सांगितले. याप्रसंगी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त श्री.मिलिंद शहा वाघोलीकर यांनी सांगितले. याप्रसंगी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त श्री.मिलिंद शहा वाघोलीकर , 'पढेगा भारत' चे संस्थापक व माजी खासदार श्री.अमर साबळे, व्यवस्थापकीय संचालिका वेणू साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, बिझनेस इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग (IOT) मशीन लर्निंग, पायथॉन, सॅप मोड्यूल्स, फॉरेन लॅग्वेजेस, ऐग्रो बिझनेस मॅनेजमेंट आदी आधुनिक तंत्रज्ञानसंगत कोर्सेस याशिवाय रोजगाराभिमुख फार्मा इंडस्ट्री कोर्सेस , हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट कोर्स तसेच ज्ञानरचनावादावर व नवनिर्मिती मूल्यांवर आधारित इ. ८ वी ते १२ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमाची निर्मिती 'पढेगा भारत'ने केली आहे.

आधुनिक तंत्रज्ञान सुसंगत , तंत्रकौशल्यावर आधारित ज्ञानरचनावाद व नवनिर्मिती मूल्यांवर आधारित उच्च दर्जाचे शिक्षण व्हर्चुअल ऑनलाईन तंत्रज्ञानाने सर्वदूर आणि माफक दरात पोहोचविण्याचा आमचा हा संकल्प असल्याचे प्रतिपादन श्री. जवाहर शहा यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की , संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयाबरोबरच अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कुल तसेच आसपासच्या परिसरातील अन्य शाळांतील विद्यार्थ्यांना देखील या उपक्रमाचा फायदा होईल असा आम्हांस विश्वास आहे.

प्राचार्य